# विषय : सहकाराचा विकास

## प्रकरण 3

## भारतातील सहकारी बँकिंग आणि पतसंस्था

## Cooperative Banking and Credit Societies in India



प्रा. महादेव कांबळे
सहाय्यक प्राध्यापक व  वाणिज्य विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

# प्राचीन काळातील भारतातील सहकारी पतपुरवठा चळवळीचे स्वरूप

## (Co-operative Credit Movement in Ancient India)

सहकार ही कल्पना भारतीय समाजाला नवीन नाही. प्राचीन काळापासून सहकार या कल्पनेचा वापर भारतीय समाज मोठ्या प्रमाणात करत असल्याचे आढळते. प्राचीन काळात कुल, ग्राम, श्रेणी व जाती या चार प्रकारच्या सामाजिक संस्था सहकाराच्या स्वरूपात कार्य करीत होत्या व त्यांचे कार्य आधुनिक सहकारी संस्थांच्या व्यवहाराच्य स्वरूपाचे होते. या संस्था विशेष करून ग्रामीण भारतीय समाजात कार्य करीत होत्या त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

## १. कुलः

कुल ही राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे कार्य करणारी संस्था सुरुवातीला अस्तित्वात आली असे मानले जाते. त्यामध्ये नात्याने जोडलेल्या व्यक्ती आणि मित्रमंडळी स्वतःचे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय हितसंवर्धन करण्यासाठी सहकार्याने कार्य करीत; परंतु पुढील काळात सामाजिक विकास आणि सामाजिक स्थिरतेबरोबर कुल संस्थेच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या कल्पना एकत्र हिंदू कुटुंब पद्धतीत संकुचित झाल्या.

## २. ग्राम :

कुल या सहकारी स्वरूपाच्या संस्थेनंतर ग्राम किंवा ग्रामसभा या सहकारी पद्धतीने चालणाऱ्या संस्थेचा उदय झाला असे मानले जाते. ग्राम किंवा ग्रामसभा या संस्थेच्या कार्याची व्याप्ती कुल संस्थेपेक्षा विस्तृत असल्याचे दिसते. ग्रामसभा ही संस्था ग्रामीण पातळीवर आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी प्रयत्न करीत असे. तसेच ग्रामीण भागातील शेती, कुरणे, रस्ते, बागा इत्यादींची व्यवस्था पाहण्याचे कामही करीत असे. याच काळात शेतकरी वर्ग आणि कारागिरांचा वर्ग उपकरणे, हत्यारे, बी-बियाणे आणि उत्पादन कार्यासाठी लागणारे इतर आवश्यक घटक यांची खरेदी व विक्री परस्पर सहकार्याने करीत असत.

## ३. श्रेणी :

श्रेणी या सामाजिक संस्थेचा विकास या काळात झाल्याचे आढळते. खेड्यातील कारागीर, हस्तकला किंवा इतर प्रकारची उत्पादने करणारे वर्ग, शेतकरी, व्यापारी, छोटे व्यापारी, सावकार, घरे आणि इतर प्रकारचे बांधकाम करणारे गवंडी आणि त्यांना साहाय्य करणारे इतर कामगार इत्यादी समाजातील विविध व्यक्तींची ती आर्थिक आणि सामाजिक संस्था होती. ही संस्था अर्थपुरवठ्याच्या कार्याबरोबर, दानधर्माचे कार्य करीत असे. व्यापारी वर्गाची प्रातिनिधिक संस्था म्हणूनही ती कार्य करीत असे.

## ४. जाती :

जातीय पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थाही त्या काळात अस्तित्वात होत्या. या संस्था विशेषतः शिक्षण, दानधर्म, आर्थिक व इतर स्वरूपाची मदत इत्यादी कार्ये जातीय पातळीवर करीत असत. त्यामुळे त्यांच्या कार्यातील सहकाराचे स्वरूप संकुचित होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. काळाच्या ओघात आधुनिक काळात कृषी क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात होत चाललेला विकास, आर्थिक विकासासाठी चाललेले पद्धतशीर प्रयत्न, आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या बदलत्या कल्पना आणि आधुनिक लोकशाही व सामाजिक कल्पनांच्या झपाट्याने होणाऱ्या प्रसारामुळे जातीय पद्धतीने कार्ये करणाऱ्या संस्था नष्ट झाल्याचे दिसते.

# भारतीय सहकारी पतपुरवठा चळवळीचा विकास-स्वातंत्र्यपूर्व काळ

## (Co-operative Credit Movement- Pro independence Period)

### १. सहकारी पतपुरवठा चळवळीच्या विकासाची प्राथमिक अवस्था (१९०४ ते १९१२ )

भारतीय सहकारी पतपुरवठा चळवळीची सुरुवात २५ मार्च, १९०४ रोजी संमत केलेल्या कायद्याने झाली. सहकारी संस्था कायदा सन १९०४ भारतीय चळवळीच्या विकासातील एक महत्त्वाची घटना असल्याने या कायद्याची माहिती असणे आवश्यक ठरते. त्या दृष्टीने या कायद्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे देता येतील.

**१. सहकारी संस्थेची स्थापना :** एकाच खेडेगावात अथवा शहरात राहणाऱ्या दहा व्यक्तींनी एकत्र येऊन बचत आणि परस्पर साहाय्यास प्रेरणा देण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करता येते.

**२. कायदेशीर अस्तित्व** : सहकारी संस्थांना कायद्याने स्वतंत्र अस्तित्व देण्यात आले होते. त्यामुळे त्यांना स्वतःच्या जबाबदारीवर निधी उभारणे, व्यापार, व्यवहार करणे शक्य होते.

**३. रजिस्ट्रारचे नियंत्रण:** सहकारी संस्थांचे संघटन, नियंत्रण आणि कारभार हे प्रत्येक राज्यातील सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारच्या नियंत्रणाखाली केले जाणार होते.

**४. रजिस्ट्रारकडून विनामूल्य हिशेब तपासणी:** सहकारी संस्थांच्या हिशेब पुस्तकाची तपासणी आणि ऑडिट, रजिस्टर, रजिस्ट्रार अथवा त्यांच्या हाताखालील सेवकवर्गांद्वारे विनामूल्य करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली होती.

**५. ग्रामीण आणि नागरी संस्था असे वर्गीकरण :** सहकारी संस्थांचे ग्रामीण संस्था आणि नागरी सहकारी संस्था असे वर्गीकरण करण्यात आले होते. त्यानुसार ग्रामीण संस्थेतील 4/5 सभासद शेतकरी असत तर नागरी सहकारी संस्थांतील है सभासद बिगर शेतकरी सभासद असत.

**६. सभासदांची जबाबदारी:** कायद्यानुसार ग्रामीण सहकारी संस्थेतील सभासदांची संस्थेबाबतची जबाबदारी मर्यादित राहणार होती तर नागरी सहकारी संस्थांच्या सभासदांची जबाबदारी मर्यादित किंवा अमर्यादित ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती.

**७. लाभांश वाटपावर मर्यादा :** ग्रामीण भागातील सहकारी संस्थांना होणाऱ्या नफ्यातून सभासदांना लाभांश देण्याची कायद्यात तरतूद नव्हती तर त्यांना आपला नफा राखीव निधीला वर्ग करावा लागत असे. नागरी भागातील संस्थांना नफ्याचा 1/4 भाग राखीव निधीला वर्ग करावा लागे आणि असा राखीव निधी विशिष्ट पातळीला गेल्यानंतर नफ्याच्या काही भागांचे वाटप बोनस रूपाने सभासदांत करता येत असे

**८. सभासदांना कर्ज:** सहकारी संस्था सभासदांना वैयक्तिक किंवा वास्तविक तारणावर कर्ज देऊ शकत. दागिन्यांच्या तारणावरही कर्ज दिले जात असे.

**९. सभासदांचे संस्थेतील हितसंबंध:** सभासदांच्या संस्थेतील किंवा संस्थेबरोबरच्या हितसंबंधांवर मर्यादा घालण्यात आली होती. सभासदास र १००० पेक्षा अधिक रकमेचे संस्थेचे भाग धारण करता येत नसत.

**१०. संस्थांना सवलती :** या कायद्याखाली स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना मुद्राकर, नोंदणी फी आणि आयकर वगैरेतून सूट देण्यात आली होती.

## २. वेगवान विकासाची अवस्था (१९९२ ते १९९८)

सुरुवातीस भारतात सहकारी पतपुरवठा चळवळ यशस्वी होईल याबद्दल सरकारला खात्री नव्हती; पण प्रत्यक्षात चळवळीने भारतात चांगले मूळ धरले आणि सहकारी पतपुरवठा चळवळीच्या विकासाच्या संदर्भात १९०४ चा सहकारी संस्था कायदा अपुरा वाटू लागला. कारण कायद्यात प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करण्याची तरतूद होती पण भारतात सहकारी चळवळीची सुरुवात झाल्यानंतर सहकारी पतपुरवठ्याखेरीज इतर क्षेत्रांतही सहकारी तत्त्वावरील संस्थांची गरज भासू लागली. त्यामुळे १९०४ च्या कायद्यातील अपुरेपणा आणि उणिवा दूर करण्याच्या दृष्टीने सरकारने १९१२ मध्ये दुसरा सहकारी कायदा संमत केला. त्या कायद्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे देता येतील,

१. बिगर पतपुरवठा संस्थांच्या निर्मितीस अनुमती

२. सहकारी संस्थांचे जबाबदारी अथवा देयतेनुसार वर्गीकरण

३. नफ्याचा वापर

४. संस्थांना विशेष अधिकार

५. सहकारी संस्थांना सवलती

६. सहकार शब्दाचा नावात वापर करण्यात प्रतिबंध

७. मध्यवर्ती संस्थेच्या स्थापनेस परवानगी

८. संस्थेचे भाग आणि हितसंबंध अबाधित

## ३. अनियोजित पण वेगवान विकासाची अवस्था (१९१९ ते १९२९)

भारत सरकारने सन १९९९ मध्ये संमत केलेल्या रिफॉर्म ॲक्टमुळे (Reform Act, 1919) सहकार हा विषय त्या वेळच्या प्रांतिक सरकारच्या (Provincial) अखत्यारीत सोपविण्यात आला. यानंतर सहकारी चळवळीने विविध प्रांतातून बरीच प्रगती केली. काही प्रांतिक सरकारांनी सहकारी चळवळीचा अभ्यास करण्यासाठी समित्या नियुक्त केल्या. तसेच सहकारी चळवळीचा अधिक चांगल्या प्रकारे विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने आपल्या राज्यातील परिस्थितीला अनुकूल असे कायदे संमत केले. मुंबई प्रांतिक सरकारने पहिल्याप्रथम असा कायदा सन १९२५ मध्ये संमत केला आणि त्या पाठोपाठ १९३२ साली मद्रासमध्ये, १९३५ मध्ये बिहार आणि ओरिसामध्ये, १९४१ साली बंगालमध्ये अशाच प्रकारचे कायदे संमत करण्यात आले.

## ४. सहकारी पतपुरवठा संस्थांच्या पुनर्रचनेची अवस्था (१९२९ ते १९३९)

सन १९२९ मध्ये सुरू झालेल्या जागतिक आर्थिक महामंदीने भारतीय सहकारी चळवळीला जबरदस्त तडाखा दिला. त्यामुळे सहकारी पतपुरवठा चळवळीची प्रगती खुंटली. त्याचबरोबर अस्तित्वात असलेल्या सहकारी संस्थांपुढेही गंभीर समस्या निर्माण झाल्या. सहकारी पतपुरवठा संस्थांनी आपल्याजवळील निधीची कृषी क्षेत्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक केली होती आणि त्यातच शेतीमालाच्या किमती मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने थकबाकीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले आणि सहकारी संस्थांचे अस्तित्व धोक्यात आले. पंजाब आणि हरियाणा प्रांतातील सहकारी चळवळीवर गंभीर परिणाम झाले. बंगाल आणि बिहारमधील सहकारी चळवळ पार कोलमडून पडली.

## ५. सहकारी पतपुरवठा चळवळीच्या पुनर्प्रगतीची अवस्था (१९३९ ते १९४७)

या काळात भारतीय सहकारी चळवळीवर पडलेले आर्थिक महामंदीचे सावट दूर झाले आणि पुन्हा एकदा सहकारी चळवळीची प्रगती होऊ लागली. महायुद्धकालीन वातावरण सहकारी चळवळीच्या विकासास पोषक ठरले. शेतीमालाच्या किमती वाढू लागल्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडली. शेतकऱ्यांची कर्जफेडीची क्षमता वाढली आणि कर्जफेडीस मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. त्यामुळे थकबाकीचे प्रमाण अर्ध्यावर आले. सहकारी पतपुरवठा संस्थांकडील ठेवीत व निधीत वाढ झाली आणि नवीन कर्जाची मागणी कमी झाली. त्यामुळे सहकारी संस्था आणि भू-तारण बँकांचा व्यवसाय कमी झाला. सन १९३९ ते १९४५ या काळात प्राथमिक पतपुरवठा सहकारी संस्थांकडील ठेवीत र २५ कोटींवरून ५४ कोटी र पर्यंत वाढ झाली.

# स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय सहकारी पतपुरवठा चळवळीचा विकास

## (Co-operative Credit Movement- Post independence Period)

१५ ऑगस्ट, १९४७ साली भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले लोकशाही सरकार अधिकारारूढ झाले. भारतीय सहकारी चळवळीच्या विकासाच्या दृष्टीतून ही एक महत्त्वपूर्ण घटना होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या आर्थिक विकासासाठी सहकारी चळवळीस मदत करण्याचे सरकारचे धोरण पुढे चालूच राहिले. या काळात निर्वासितांचे पुनर्वसन आणि निवृत्त सैनिकांना नोकऱ्या उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सरकारने गृहनिर्माण, औद्योगिक आणि सहकारी शेती विकासाला अधिक चालना दिली. या कालावधीत गृहनिर्माण सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था आणि सहकारी शेतीचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. तसेच सहकारी चळवळीचे क्षेत्र विस्तारले. याच काळात उत्तर प्रदेश, मद्रास, मुंबई आणि म्हैसूर राज्यांतून बहुउद्देशीय सहकारी संस्थांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.

## १. पहिल्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी पतपुरवठा क्षेत्राचा विकास

पहिल्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठा क्षेत्राबाबत पुढीलप्रमाणे धोरण ठरविण्यात आले.

१. सहकार हे लोकशाही नियोजनाचे एक साधन आहे हे लक्षात ठेवून स्वयंप्रेरणा, परस्पर हितसंवर्धन आणि सामाजिक हेतू या त्रिसूत्रीच्या आधारे सहकारी क्षेत्राच्या विकासाचा कार्यक्रम ठरविणे.

२. ग्रामीण भागातील सहकारी संस्थांचा पंचायतीशी निकटचा संबंध निर्माण

३. ग्रामीण भागातील जनतेच्या बहुतेक गरजा पुन्या करता येतील अशा करणे. बहुउद्देशीय भांडारांचा विकास करणे.

४. पहिल्या योजनेत देशातील ५० टक्के खेडी आणि ३० टक्के ग्रामीण जनता सहकारी क्षेत्राखाली आणणे.

५. शेतीतील उत्पादनवाढीसाठी दरसाल १३० कोटी ₹ पतपुरवठा करणे.

६. सहकारी शेतीचा विकास करणे.

७. सहकारी चळवळीचा आदर्श आणि वेगवान विकास व्हावा यासाठी सहकारी सेवकवर्गाच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

८. शेती उत्पादनास योग्य किंमत मिळण्यासाठी पतपुरवठ्याच्या जोडीला सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा विकास करणे.

## २. दुसरी पंचवार्षिक योजना आणि सहकारी पतपुरवठा क्षेत्राचा विकास

अखिल भारतीय पतपुरवठा पाहणी समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुरोधाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे ठरविण्यात आली, ती पुढीलप्रमाणे

१. मोठ्या आकाराच्या पतपुरवठा संस्थांचा विकास करणे.

२. प्रत्येक जिल्ह्यात अर्थक्षम मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्याच्या दृष्टीने सहकारी बँकिंग रचनेची पुनर्रचना करणे.

३. प्राथमिक खरेदी-विक्री संस्थांची पुनर्रचना करणे..

४. ज्या राज्यात मध्यवर्ती भू-तारण बँका नाहीत तेथे त्यांची स्थापना करणे.

५. प्रक्रिया संस्थांचा विकास करणे, गुदामांचा विकास करणे.

६. सहकारी संस्थांचे निरीक्षण, तपासणी आणि हिशेब तपासणी अधिक बळकट करणे.

७. राज्य पातळीवर मदत आणि हमी निधी निर्माण करणे.

८. सहकारी सेवकांच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

# ३. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी पतपुरवठा क्षेत्राचा विकास

तिसऱ्या योजनेतील सहकारी क्षेत्राबाबतची उद्दिष्टे खालीलप्रमाणे ठरविण्यात आली आहेत.

१. भारतातील सर्व खेडी सहकारी पतपुरवठ्याखाली आणणे आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या जनतेपैकी ६० टक्के जनता सहकारी क्षेत्राखाली आणणे.

२. प्राथमिक शेती अर्थपुरवठा संस्था अधिक सुदृढ करण्यासाठी त्यांची पुनर्रचना करणे.

३. शेतीस सहकारी संस्थांमार्फत ५३० कोटी र अल्प आणि मध्यम मुदतीची आणि १५० कोटी रुपयांची दीर्घ मुदतीची कर्जे पुरविणे.

४. तिसऱ्या योजनेअखेर भारतातील सर्व खेडी सहकारात समाविष्ट होतील अशा प्रकारे सहकारी संस्थांचा विकास करणे.

५. खरेदी-विक्री आणि प्रक्रिया संस्थांचा विकास करणे आणि खरेदी-विक्री संस्थांशी पतपुरवठ्याची सांगड घालणे.

६. ग्रामीण आणि नागरी भागात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करता येण्याच्या दृष्टीने ग्राहक भांडारांचा विकास करणे.

७. सहकारी तत्त्वावर लघुउद्योगांचा विकास करणे.

८. सहकार क्षेत्रातील विविध पातळ्यांवरील सेवक वर्गाची कार्यपात्रता वाढविणे.

## ४. चौथ्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी पतपुरवठा क्षेत्राचा विकास

चौथ्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठा क्षेत्राच्या विकासासाठी १७८.५७ कोटी ₹ तरतूद करण्यात आली. देशातील सहकारी क्षेत्राचा सुसूत्र विकास घडवून आणण्यासाठी चौथ्या पंचवार्षिक योजनेत पुढील कार्यक्रम ठरविण्यात आला.

१. प्राथमिक सहकारी संस्थांचे जाळे आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने त्या संस्थांची पुनर्रचना करणे, मध्यवर्ती बँकांचे पुनर्वसन आणि पुनर्रचना करणे, प्राथमिक संस्थांना प्रत्यक्ष कर्जपुरवठा करणे, थकबाकीचे प्रमाण कमी करणे, कृषी पतपुरवठा स्थैर्य निधी मजबूत करणे, संस्थांच्या देखरेख आणि निरीक्षणाची व्यवस्था करणे आणि ग्रामीण भागातून बचती गोळा करण्यासाठी सहकारी बँकांचे जाळे ग्रामीण भागात निर्माण करणे.

२. सहकारी संस्था आणि भूविकास बँकांची धोरणे लहान शेतकऱ्यांना अनुकूल ठरतील अशा प्रकारे आखणे.

३. खरेदी-विक्री संस्थांद्वारे ९०० कोटी ₹ उलाढाल करणे. २५ कोटी र आंतरराज्यीय व्यापार आणि १० कोटी ₹ आयात-निर्यात करणे.

४. सहकारी संस्थांमार्फत ६५० कोटी ₹ खते, ५० कोटी ₹ बी-बियाणे, ५० कोटी रुपयांची कीटकनाशके आणि १५ कोटी रुपयांच्या अवजारांचे वाटप करणे.

५. सहकारी संस्थांची गुदामक्षमता २० लक्ष टनांनी वाढविणे आणि ग्राहक भांडारांमार्फत ५०० कोटी रुपयांच्या वस्तूंचे वाटप करणे.

६. योजना काळात १६०० शेतीमाल प्रक्रिया संस्था निर्माण करणे व इतर सहकारी संस्थांचाही विकास करणे.

## ५. पाचव्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी पतपुरवठा क्षेत्राचा विकास

'सामाजिक न्यायासाठी विकास या राष्ट्रीय धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सहकारी क्षेत्राचा वापर या योजनेत केला जाणार होता. इतर उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली.

१. पतपुरवठा, वितरण, विक्री, प्रक्रिया इत्यादी शेती विकासाला मदत करणाऱ्या सहकारी संस्थांचे जाळे भक्कम करणे.

२. आर्थिकदृष्ट्या बळकट आणि भक्कम ग्राहक सहकारी चळवळ उभारणे.

३. सहकारी चळवळीच्या विकासातील आणि विशेषत: पतपुरवठ्यातील विषमता दूर करणे.

४. लहान शेतकरी आणि मागासवर्गीयांना अधिक उपयोग होईल अशा प्रकारे सहकारी संस्थांची पुनर्रचना करणे. या योजनेत सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी ४२३ कोटी रुपयांची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले

## ६. सहाव्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी पतपुरवठा क्षेत्राचा विकास (१९७६-८१)

सहाव्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठा क्षेत्रासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. सभासदांच्या सर्व गरजांची पूर्तता करता येईल इतपत प्राथमिक संस्था सुदृढ करणे की, ज्यामुळे भविष्यकाळात त्या बहुउद्देशीय संस्थांप्रमाणे कार्य करतील.

२. सहकाराच्या धोरणाचा आणि पद्धतीचा ग्रामीण भागांतील गरीब व्यक्तींच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने पुनर्विचार करणे.

३. पतपुरवठा संस्थांबरोबर फळबागा प्रक्रिया उद्योग, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मच्छीमारी, पशुपालन इत्यादींचा पतपुरवठा, वस्तू पुरवठा, विपणन आणि इतर सेवांच्या साहाय्याने विकास करण्याच्या दृष्टीने सहकारी संघीय संस्थांची पुनर्रचना करणे व त्या सबळ बनविणे.

४. सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी प्रशिक्षित, व्यावसायिक व्यवस्थापकांचा वर्ग तयार करणे.

## ७. सातव्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी पतपुरवठा क्षेत्राचा विकास

सातव्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठा क्षेत्रासंबंधी खालील गोष्टी ठरविण्यात आल्या आहेत.

१. प्राथमिक सहकारी संस्थांचा त्यांनी बहुउद्देशीय संस्था या स्वरूपाचे कार्य करावे अशा प्रकारे विकास करणे.

२. ग्रामीण भागातील दुर्लक्षित वर्गास सहकारी संस्थांद्वारे अधिक सेवा देणे.

३. देशाच्या उत्तर भागात सहकारी क्षेत्राचा विकास करणे.

४. देशाच्या शहरी व ग्रामीण भागांत वस्तू वितरणाचे कार्य अधिक प्रभावीपणे बनविण्याच्या दृष्टीने ग्राहक सहकारी चळवळीचा विकास करणे.

५. सहकारी प्रशिक्षणाचे कार्य प्रभावी बनविणे.

## ८. आठव्या पंचवार्षिक योजना काळातील सहकारी पतपुरवठा क्षेत्राचा विकास

ग्रामीण भागात उत्पादन वाढ आणि अधिक रोजगार निर्माण व्हावेत यासाठी सहकारी चळवळ ही स्वयंशासित आणि स्वयंपूर्ण अशी असावी असे ठरले. राष्ट्रीय योजनांना अग्रक्रम देणे आणि दारिद्र्यनिर्मूलन यासाठी सहकारी क्षेत्रास पुरेसा अर्थपुरवठा करण्याचे ठरले. योजना काळात ग्राहक सहकारी संस्था आणि सार्वजनिक वाटप यात जवळीकता निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच प्रशिक्षण कार्याकडे लक्ष देण्याचे ठरविण्यात आले. आठव्या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली.

## ९. नवव्या पंचवार्षिक योजना काळातील स्थिती

सन १९९२ साली सरकारने सहकार क्षेत्राबाबतचे आपले धोरण निश्चित केले होते. त्यामुळे सरकार क्षेत्रात लोकशाही खऱ्या अर्थाने नांदावी यासाठी सरकारचे हस्तक्षेप आणि नियंत्रण कमी करण्याचे धोरण अवलंबण्यात आले. त्यामुळे सहकारी क्षेत्र अधिक प्रभावी करण्यासाठी उपाययोजना करणे, सहकारातील महिला वर्गाचा सहभाग वाढविणे, सहकारी क्षेत्राखाली अधिकाधिक खेडी आणि लोकसंख्या आणणे, कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधणे, पतपुरवठा अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीची कर्जे एक संस्थेमार्फत मिळण्याची सोय करणे, व्यवस्थापनात व्यावसायिकता आणणे, थकबाकीचे प्रमाण कमी करणे, अल्पभूधारक, भूमिहीन मजूर, कारागीर आणि कुटीरोद्योग इत्यादींच्या विकासासाठी लक्ष देणे इत्यादी बाबींवर भर देण्याचे ठरविण्यात आले

## १०. दहाव्या पंचवार्षिक योजना काळातील स्थिती (२००२ ते २००७)

दहाव्या पंचवार्षिक योजनेची सहकारी पतपुरवठा क्षेत्राबाबतची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली.

१. सहकारी क्षेत्रातील पतपुरवठा संस्थांना अधिक गतिमान बनविणे.

२. सहकारी संस्थांचा खर्च कमी करणे.

३. पतपुरवठा संस्थांद्वारे होणाऱ्या पतपुरवठा कार्यक्षमता आणणे.

४. जिल्हा मध्यवर्ती बँकांना बिगर कृषी क्षेत्राकडे अधिक लक्ष देण्यास सांगणे आणि त्याद्वारे रोजगारात वाढ करणे, ग्रामीण गरीब, लहान भागातील शेतकरी, भूमिहीन शेतकरी, मागासवर्गीय लोक आणि महिला यांच्यासाठी विकास कार्यक्रमाची आखणी करणे.

## ११. अकरावी पंचवार्षिक योजना (२००७ ते २०१२)

अकराव्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठ्याबाबत खालील उद्दिष्टे ठरविण्यात आली.

१. सहकारी पतपुरवठा संस्था अधिक सक्षम करणे की, ज्यामुळे या संस्था आपली पतपुरवठा कार्ये अधिक कार्यक्षमपणे आणि परिणामकारकपणे पार पाडतील.

२. शेतकऱ्यांना अल्प, मध्यम मुदती आणि दीर्घमुदती कर्जाचा पुरवठा 'एक 'खिडकी' योजनेखाली म्हणजे एके ठिकाणीच करणे.

३. ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या पतपुरवठा संस्था अधिक सक्षम बनविणे.

४. ग्रामीण भागात रोजगार वाढीसाठी प्रयत्न करणे. त्यासाठी अल्पभूधारक आणि भूमिहीन शेतकऱ्यांना उद्योग आणि कुटीरोद्योगासाठी मदत करणे.

५. सीमांत शेतकरी, भूमिहीन शेतकरी, भटक्या जमाती आणि ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या पिछाडीस असलेल्या गटांना लघुउद्योग आणि स्वयंरोजगारासाठी मदत करणे.

## १२. बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१७)

पंचवार्षिक योजनांमधील शेवटची व सध्या चालू असणारी अशी ही पंचवार्षिक योजना आहे. पंचवार्षिक योजनांमधील नवव्या पंचवार्षिक योजनेपासूनच सहकार हा राज्यांच्या अखत्यारीत येणारा विषय करण्यात आला होता. सहकारी क्षेत्रातील हस्तक्षेप व नियंत्रण कमी करणे हा त्यामागील उद्देश होता. बाराव्या पंचवार्षिक योजनेत सहकार विषयाचा अंतर्भाव हा केवळ सहकारी संस्था, संघटना व विभाग यांचे सक्षमीकरण करणे इतकाच मर्यादित केला असून, सहकारी संस्थांनी स्वतः सक्षम बनावे ही अपेक्षा इथे ठेवण्यात आली आहे.

# भारतीय सहकारी पतपुरवठा रचना

## (Co-operative Credit Structure)


भारत हा कृषिप्रधान देश असून ६० टक्क्यांहून अधिक लोक शेती या व्यवसायावर अवलंबून आहेत. परंतु कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय कृषी क्षेत्राची एकूण स्थिती चिंताजनक होती. सावकार व महाजनांच्या विळख्यात शेतकरी सापडला आणि कर्जाच्या बोजात अधिक रुतत गेला. शेतीच्या जुन्या-पुराण्या पद्धती, पाण्याचा अपुरा पुरवठा यामुळे कृषी उत्पादनात वाढ होत नव्हती. कारण शेती व्यवसायाला व्यापारी बँका कर्जपुरवठा करीत नसत आणि शेतकऱ्यास इतर मार्गानेही फारसा कर्जपुरवठा होत नव्हता. सहकारी चळवळ व पतपुरवठ्यामुळे त्यास थोडासा दिलासा मिळाला. मात्र, स्वातंत्र्योत्तर काळात परिस्थितीत बराच बदल झाला.

शेतकऱ्यांना प्रामुख्याने खालील तीन प्रकारच्या कर्जांची आवश्यकता असते.

**१. अल्प मुदतीचे कर्ज (Short Term Loan)** हे कर्ज शेतीचा हंगाम सुरू होण्यापूर्वी बी-बियाणे, खते, जंतुनाशके खरेदी करणे, शेतीची मशागत करणे यासाठी आवश्यक असते. त्याची मुदत तीन महिने ते एक वर्षाची असते.


**२. मध्यम मुदतीचे कर्ज (Medium Term Loan):** हे कर्ज सामान्यपणे बैल खरेदी करणे, विहीर खोदणे, पाईपलाईन टाकणे, शेतीला बांध घालणे, विहिरीवर पंप बसविणे इत्यादींसाठी आवश्यक असते. त्याची मुदत एक वर्ष ते पाच वर्षांपर्यंत असू शकते.

**३. दीर्घ मुदतीचे कर्ज (Long Term Loan) :** हे कर्ज नवीन खरेदी, ट्रॅक्टर खरेदी, जुने कर्ज भागविणे, पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे इत्यादींसाठी आवश्यक असते. त्याची मुदत पाच ते पंचवीस वर्षांपर्यंत असू शकते.




अशा प्रकारे राज्य सहकारी बँका मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँकांना आर्थिक मदत करतात. राज्य सहकारी बँकांचा स्वतःचा निधी असतो. तसेच नाबार्ड, राज्य सरकार आणि रिझर्व्ह बँकेकडून मदत मिळते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राज्य सहकारी बँकांकडून मिळणाऱ्या मदतीच्या आधारे प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना मदत करतात, ती मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचते.

दीर्घ मुदतीच्या कर्जासाठी राज्य स्तरावर राज्य सहकारी भूविकास बँका कार्य करीत असून त्यांच्याद्वारे जिल्हा स्तरावर किंवा विभागात कार्य करणाऱ्या प्राथमिक भूविकास बँकांना मदत केली जाते. ती मदत त्यांच्याद्वारे शेतकरी वर्गापर्यंत पोहोचविली जाते.



भारतीय सहकारी पतपुरवठा रचनेत ग्रामीण पातळीपासून राज्य आणि राष्ट्रीय पातळीपर्यंत कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांच्या कार्याचा आढावा खालील तक्त्याच्या आधारे घेता येईल.

**त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा रचना (३१ मार्च, २०१८ ची स्थिती)**

| तपशील | प्राथ. कृषी सह. पत संस्था | जिल्हा मध्य. सह. बँका | राज्य सहकारी बँका |
|---|---|---|---|
| १. संस्थांची संख्या | ९५२३८ | ३६३ | ३२ |
| २. सदस्य संख्या | १३०५४७००० | -- | -- |
| (अ) सहकारी संख्या | -- | ४७२६७५ | २४७४२ |
| (ब) व्यक्तिगत | -- | २५६९५५१ | ६५१२६४ |
| ३. वसूल भागभांडवल | | | |
| (अ) एकूण | १४१४२०० | १५९०७२३ | ५२७८०५ |
| (ब) सरकारचा हिस्सा | ८०७३९ | २१९०७१ | ८९८६४ |
| ४. स्वनिधी | १६७९९७१ | ३५३२१५४ | १३३०३४३ |
| ५. एकूण ठेवी | ११९६३२३३ | ६८१४७५७४ | २४१२०८४८ |
| ६. घेतलेली कर्जे | १२८३३३२२ | ८५९१७९८ | ७१२२४०६ |
| ७. दिलेली कर्जे | ४१४६४३५६ | ४८४११७०२ | २५५९१२२२ |
| ८. खेळते भांडवल | २४३५६२५१ | ४८३२१०२७ | २१५७८६२६ |

(संदर्भ : राज्य सहकारी बँकांचा राष्ट्रीय संघ) (रु. लाखांत)

## द्विस्तरीय सहकारी पतपुरवठा रचना (३१ मार्च, २०१८ ची स्थिती)

| तपशील | राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक | प्राथ. सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक |
|---|---|---|
| १. संस्थांची संख्या | १३ | ६०१ |
| २. शाखांची संख्या | ७८९ | ६६१ |
| ३. भांडवल | ९४५ | १०५४ |
| ४. राखीव निधी | ३३६० | २२३४ |
| ५. ठेवी | २३४१ | १३०६ |
| ६. वाटप कर्ज | २०७८८ | १५८२१ |

(संदर्भ : नाबार्ड वार्षिक अहवाल २०१८-१९) (रु. कोटीत)

# प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

## (Primary Agricultural Co-operative Credit Societies)

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था म्हणजेच प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था होत. ग्रामीण शेतकऱ्यांना अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जाचा पुरवठा करून शेतीचा विकास साधणे आणि ग्रामीण भागाच्या आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणे हा या संस्थांचा मूलभूत उद्देश होता. काळाच्या ओघात फक्त कर्जपुरवठ्याचे कार्य न करता शेतीसाठी अवजारे, बियाणे, खते व जंतुनाशके पुरविणे आणि शेतकरी वर्गास जीवनावश्यक वस्तू व सेवा पुरविण्याचे कार्य या संस्थांकडे देण्यात आले.

# प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था – व्याख्या

**श्रीयुत बी. मुखर्जी** यांच्या मताप्रमाणे, आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी परस्पर साहाय्य आणि सहकाराच्या तत्त्वावर ग्रामीण भागातील लोकांनी स्थापन केलेल्या संस्था होय.' कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना सेवा सहकारी संस्था किंवा प्राथमिक सहकारी संस्था असेही म्हटले जाते.

बलवंतराय मेहता समितीने 'कृषी (सेवा) सहकारी पतपुरवठा संस्था म्हणजेच जनतेच्या विविध गरजा भागविणारी एक विविध कार्यकारी सोसायटी' असे म्हटले आहे.

# प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्ये (Functions)

१. **कर्जपुरवठा:** ग्रामीण भागातील संस्थेच्या सभासदांना अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा या संस्थांद्वारे केला जातो. पीक कर्जे, दुभती जनावरे खरेदी कर्जे, जिल्हा बँकांच्या वतीने शेतकऱ्यांना देण्यात येणारी इतर कर्जे आणि अनुदान पतपुरवठा संस्थांमार्फत दिले जाते.

२. **कृषी वस्तूंचा पुरवठा :** शेतीसाठी उपयुक्त अशी बियाणे, खते, जंतुनाशके, अवजारे, पशुखाद्य इत्यादी प्रकारच्या वस्तूंचा पुरवठा वाजवी किमतीत आणि नियमितपणे करण्याचे कार्य केले जाते..

**३. शेतीसाठी सेवा :** शेतकरी वर्गास त्याने उत्पादन केलेल्या शेतमालाचा साठा करण्याची सुविधा देणे, शेतमाल बाजारपेठेला पाठविण्यास मदत करणे किंवा शेतमाल प्रक्रिया संस्थांना पाठविणे तसेच शेतकऱ्यांची मालविक्रीची बिले संबंधित व्यापारी किंवा संस्थेकडून वसूल करून शेतकऱ्यास भागविणे इत्यादी सेवा दिल्या जातात.

**४. तांत्रिक मार्गदर्शन व सल्ला :** या संस्था शेतकऱ्यांना नवीन सुधारित बी-बियाणांची माहिती देणे, खतांचा वापर, जंतुनाशकांचा वापर, हत्यारे व अवजारे वापरण्याची पद्धती, पाण्याचा वापर, हवामानातील बदलाचे पिकांवर होणारे परिणाम आणि घ्यावयाची काळजी, जमिनीचा पोत सुधारण्यासाठी करावयाचे प्रयत्न इत्यादींबाबत तांत्रिक माहिती देणे व सल्ला देण्याच्या कार्यात या संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते.

**५. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा :** पावसाळ्यात अडचणींमुळे दुर्गम भागातील जनतेचे जीवन कष्टमय बनते. कृषी पतपुरवठा संस्था ग्रामीण जनतेला अन्नधान्य, रॉकेल, मीठ, आगपेटी, साखर इत्यादींसारख्या वस्तूंचा पुरवठा नियमितपणे आणि वाजवी किमतीत करतात. त्यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील जनतेचे जीवन सुसह्य बनते.

**६. अवजारांची उपलब्धता :** शेतीसाठी शेतकरी वर्गास लहान-मोठ्या अवजारांची आणि यंत्रांची आवश्यकता असते. अशी यंत्रे व अवजारे विकत घेणे सर्व शेतकऱ्यांना शक्य होत नाही, परंतु शेती कामासाठी त्याची निकड असते. कृषी पतपुरवठा संस्था अशी यंत्रे व हत्यारे आपणाकडे ठेवून गरजेनुसार शेतकरी वर्गास वाजवी भाड्याने देऊ शकतात.

**७. शेतमाल खरेदी-विक्रीस मदत :** शेतकऱ्यांना शेतमालाची साठवण किंवा संग्रहण करणे, शेतमाल बाजारपेठेस पाठविणे, मालाची खरेदी-विक्री, माल खरेदी विक्रीच्या नोंदी ठेवणे तसेच विक्री मालाचे पैसे वसुली इत्यादी बाबतीत संस्था मदत करतात.

**८. बियाणे व खतांचे उत्पादन :** ग्रामीण भागात बियाणे तयार करणे, बियाणांचे वाटप करणे तसेच कंपोस्ट खते तयार करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करतात.

**९. शेती विकास :** शेती विकासाच्या दृष्टीतून माती परीक्षण, पिके घेणे, खतांचा वापर, जंतुनाशकांचा वापर, नैसर्गिक आपत्तीत पिकांबाबत घ्यावयाची काळजी, अधिक पीक येण्यासाठी सुधारित बियाणांचा वापर, आधुनिक शेती तंत्राची माहिती देणे इत्यादी बाबतीत संस्था शेतकऱ्यांना मदत करतात.

**१०. कर्ज वापरावर लक्ष :** सभासदांना ज्या कारणासाठी कर्जे दिली, त्या कारणासाठी कर्जाचा वापर होतो काय ? त्याकडे लक्ष देणे तसेच कर्जाची वसुली वेळेवर करणे.

**११. बचती व ठेवींना प्रोत्साहन :** संस्थेद्वारे सभासदांना अल्प ठेवी व बचती ठेवण्यास लावणे, बचतीची सवय लावणे, सभासदांकडून आवर्ती व मुदती ठेवी गोळा करणे याकडे लक्ष दिले जाते.

**१२. सभासदांना शिक्षण:** सभासदांना परस्पर सहकार्य, स्वावलंबन, बचत करणे इत्यादींचे महत्त्व समजावून सांगणे, नवीन शेती तंत्राची व पद्धतीची माहिती देणे, शेती अवजारे व यंत्रांच्या वापराचे शिक्षण देणे, सभासदांना शेती समस्यांसंबंधी मार्गदर्शन करणे इत्यादींद्वारे शिक्षण देण्याचे कार्य संस्था करतात.

**१३. कृषी उद्योगांच्या विकासास मदत:** कृषी उत्पादनवाढीस मदत करून एक प्रकारे प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ग्रामीण आणि शहरी भागातील कृषी उद्योगांच्या विकासास मदत करतात. साखर कारखाने, डेअरी, डाळ मिल, भात गिरण्या, पीठ गिरण्या, तेल गिरण्या, कापड कारखाने इत्यादींच्या विकासास अप्रत्यक्षपणे सहकारी पतपुरवठा संस्था मदत करीत असतात.

# १४. मध्यस्थांचे आणि सावकारांचे उच्चाटन

सहकारी पतपुरवठा प्रथम ग्रामीण भागातून सावकारांचे उच्चाटन करतात. नंतर शेतमाल खरेदी विक्रीस येणाऱ्या मध्यस्थांचे उच्चाटन करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. सावकारांच्या उच्चाटनामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारते. शेतकरी भूमिहीन बनण्याच्या दुष्ट प्रवृत्तीस आळा बसतो.

## १५. पीक कर्जाचा पुरवठा :

प्राथमिक सहकारी संस्थांच्या कार्यात आणि स्वरूपात आता बदल होत आहे. त्या फक्त अल्प मुदती कर्जे आणि कृषी उत्पादन साहित्याचे वाटप करणाऱ्या संस्था राहिल्या नसून आता त्या शेतकऱ्यांना पीक कर्जे देतात. म्हणजे पीक घेणे, पिकांची जोपासना आणि विक्रीतून कर्जफेड अशी साखळी तयार केली जाते. शेतात कोणती पिके घ्यावयाची, त्यांचा अंदाजे खर्च येणारे उत्पन्न, शेतकऱ्यांची कर्जफेडीची क्षमता इत्यादींचा विचार करता कर्जे दिली जातात.

# प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या समस्या (Problems)

**१. असमतोल विकास :** या संस्थांचा देशातील सर्व राज्यांत सारख्या प्रमाणात विकास झाला नाही. देशाच्या दक्षिण व पश्चिम भागातील संस्था क्रियाशील आहेत. त्यामानाने पूर्व व उत्तर भागातील संस्था कमकुवत आहेत. असमतोल विकासामुळे धोरणाच्या बाबतीत सारखेपणा ठेवता येत नाही.

**२. अक्षम संस्था :** भारतीय सहकारी क्षेत्रातील पतपुरवठा संस्था सक्षम व बलवान नाहीत. त्यांच्याकडील सभासद संख्या कमी असून भांडवलही अपुरे आहे. अपुऱ्या भांडवलामुळे या संस्था सभासदांच्या शेतीसाठीच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यास असमर्थ ठरतात.

## ३. कर्जविषयक सदोष धोरण :

पतपुरवठा संस्थांचे कर्जविषयक धोरण सदोष असून कर्जवाटप व कर्ज वसुली वेळेवर होत नाही. कर्ज रोख व एकदम एका हप्त्यात दिले जाते. कर्जाचा हप्त्याने आणि काही प्रमाणात वस्तुरूपात पुरवठा करणे आवश्यक आहे. पिकाच्या तारणावर कर्जे देणे अजूनही शक्य झालेले नाही. संचालक मंडळातील सदस्यांच्या मित्र आणि नातेवाइकांना सढळ हाताने कर्जवाटप केले जाते.

**४. कर्जवाटपात दिरंगाई :** शेतकऱ्यांना कर्जाचा पुरवठा वेळेवर होत नाही. त्यामुळे हंगामात कर्ज न मिळाल्यास त्याचा शेतकऱ्यास फायदा होत नाही. त्यामुळे कर्जाचा वापरही इतर कारणांसाठी होतो आणि शेतीचे उत्पादनही घटते. कर्जवाटपात दुटप्पी धोरण ही पण एक समस्या आहे.

**५. कर्ज व शेतमाल विक्री कार्यात सांगड नाही :** कर्जवाटप करणाऱ्या संस्थांना कर्जवाटप आणि शेतमाल विक्री या दोन्ही कार्याची सांगड घालण्यास अजूनही पुरेसे यश आलेले नाही. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था व सहकारी खरेदी-विक्री संस्थांत समन्वय प्रस्थापित करण्यात अजूनही पूर्ण यश मिळालेले नाही.

**६. कर्जवसुलीस अपयश:** पतपुरवठा संस्थांना थकबाकीचे प्रमाण कमी करण्यात यश आले असले तरी कर्जवसुली वेळेवर करणे पूर्णपणे शक्य झालेले नाही. बऱ्याच वेळा कर्जाचे नूतनीकरण केले जाते. त्यामुळे थकबाकी प्रमाण कमी करणे शक्य होत नाही.

**७. निष्क्रिय संस्था :** सहकार क्षेत्रातील पतपुरवठा संस्थांतील निष्क्रिय संस्थांचे प्रमाण अजूनही अधिक आहे. सन २०१७ मध्ये २६८१ संस्था म्हणजे एकूण पतपुरवठा संस्थांच्या २.८० टक्के संस्था निष्क्रिय होत्या. (तर १५२६ संस्था बंद होत्या.) हे प्रमाण कमी होणे अत्यंत आवश्यक आहे. निष्क्रिय व बंद संस्था सभासदांचे हित साधू शकत नाहीत.

**८. अपुरे पर्यवेक्षण :** कृषी अर्थपुरवठा संस्थांच्या पर्यवेक्षणासाठी राज्यांतून पुरेशी व्यवस्था नाही. कर्ज वापरावर लक्ष ठेवले जात नाही. त्यामुळे कर्जाचा अन्य कारणांसाठी वापर होण्याचे प्रमाण अधिक आहे. संस्थांच्या पर्यवेक्षणात सातत्य नसते.

**९. व्यवस्थापनात परिणामकारकतेचा अभाव :** प्राथमिक सहकारी संस्थांना अजूनही सुशिक्षित व कार्यक्षम व्यक्तींचा समावेश असलेले व्यवस्थापन लाभलेले नाही. बरेच सभासद संस्थेच्या कार्यात फारसा रस घेत नाहीत. बऱ्याच संस्थांच्या वार्षिक सभाही नियमितपणे होत नाहीत.

# प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या समस्या दूर करण्यासाठीचे उपाय (Remedies to Problems)

## १. सहकारी पतसंस्थांनी ग्रामीण बँका म्हणून कार्य करावे:

सहकारी संस्थांनी फक्त सक्षम होण्यासाठी प्रयत्न करावेत, तसेच या सहकारी संस्थांनी ग्रामीण बँका म्हणून कार्य करण्याची गरज आहे, अशी सूचना केली जाते. निधींची कमतरता ही या संस्थांची महत्त्वाची समस्या असून या संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याखेरीज त्यांच्या कार्यातील निष्क्रियता कमी होणार नाही.

**२. निधीची उभारणी :** पुरेसे भांडवल असल्याशिवाय कोणतीही संस्था सक्षम होऊ शकत नाही. सहकारी संस्थांनी आपली कार्यशक्ती वाढविण्यासाठी आपले भागभांडवल व आपला राखीव निधी यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तसेच सभासदांकडून ठेवी स्वीकाराव्यात.

**३. कर्जांची विक्रीशी सांगड :** वेळेवर वसुली होण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सहकार्य घेतले पाहिजे. शेतमालाच्या विक्रीतून कर्जाची वसुली करण्याच्या या पद्धतीला अत्यंत महत्त्व आहे. यामुळे थकबाकीचे प्रमाण कमी होऊन शेतकऱ्यांना दरवर्षी वाढत्या प्रमाणात कर्जे मिळू शकतील.

**४. पूरक सेवा:** शेतकऱ्यांना केवळ कर्जपुरवठा करून भागत नाही तर त्यांना पूरक सेवाही पुरविल्या पाहिजेत. खते, बी-बियाणे, कीटकनाशके, मालाची विक्री, गुदामे, शेतीविषयक मार्गदर्शन इत्यादी सेवांचीही रोख कर्जाइतकीच शेतकऱ्यांना आवश्यकता असते.

**५. परिणामकारक देखरेख व अंकेक्षण:** सहकारी संस्थांच्या कार्यक्षम कारभारासाठी त्यांच्या कार्यावर परिणामकारक देखरेख व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्यांचे हिशेब प्रशिक्षित अशा हिशेब तपासनिसाकडून तपासून घेतले पाहिजेत.

## ६. हितसंबंधियांचे वर्चस्व कमी करणे:

या संस्थांतील हितसंबंधी लोकांचे वर्चस्व कमी करण्याचे प्रयत्न सातत्याने झाले पाहिजेत. मिर्धा समितीने अशी सूचना केली आहे की, 'ग्रामीण भागातील सावकारांना प्राथमिक शेती सहकारी संस्थांचा सभासद होण्यास अपात्र ठरवावे.' माजी न्यायमूर्ती गजेंद्रगडकर यांनी असे मत व्यक्त केले आहे की, 'सहकारी संस्था शक्तिशाली घटकांच्या हातातील तलवार बनण्यापेक्षा कमकुवत घटकांची ढाल झाली पाहिजे.'

**७. कर्जवसुलीत सुधारणा :** थकीत कर्जाचे वाढते प्रमाण ही सहकारी संस्थांची महत्त्वाची समस्या आहे. संस्थांनी वसुलीचे प्रमाण वाढवून एन. पी. ए. कमी करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी सनदशीर मार्गाने आणि वेळप्रसंगी कायद्याचा आधार घेऊन वसुली प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

**८. लहान शेतकऱ्यांना चांगली सेवा पुरविणे:** लहान शेतकरी व कमकुवत घटकांची सेवा हे सहकारी चळवळीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सहकारी संस्थांनी आपल्या कर्जविषयक धोरणात आवश्यक बदल करून लहान व कमकुवत शेतकऱ्यांना अधिक मदत करण्याचा व चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करावा.

**९. व्यवस्थापनात कार्यक्षमता आणणे:** सहकार संस्था अधिक कार्यक्षम बनल्या पाहिजेत व त्यासाठी व्यवस्थापनात अनुभवी व शिक्षित व्यक्तींचा सहभाग आवश्यक आहे. तसेच संस्थेला पूर्ण वेळ अशा पगारी चिटणिसाची आवश्यकता आहे.

**१०. सभासदांना प्रशिक्षण :** सहकारी संस्थांतील सभासदांना संस्थेचे व्यवहार, संस्थेची कार्यपद्धती, संस्थेचे हिशेब इत्यादींबरोबर स्वसेवा, स्वावलंबन, लोकशाही पद्धतीने कारभार, सभासदांचे हक्क व कर्तव्ये, एकता आणि समानता यांबाबत शिक्षण आणि प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे सभासदांतील मतभेद आणि वर्गभेद कमी होऊन त्यांच्यात संस्थेचे कार्य आणि संस्थेचे हित याबाबत सकारात्मक दृष्टिकोण निर्माण होण्यास मदत होईल.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

## (District Central Co-operative Banks)

सहकारी पतपुरवठा रचनेत दुसऱ्या स्तरावर जिल्हा पातळीवर कार्य करणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा समावेश होतो. या बँका राज्य सहकारी बँका आणि नाबार्डकडून होणारा पतपुरवठा कृषी सहकारी पतसंस्थांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करतात. त्यामुळे राज्य सहकारी बँका आणि कृषी पतपुरवठा संस्था यांच्यातील दुवा म्हणून मध्यवर्ती सहकारी बँका कार्य करतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जिल्ह्यातील सर्व कृषी पतपुरवठा संस्थांच्या गरजांचा अभ्यास केला जातो आणि कर्जाचे प्रस्ताव राज्य सहकारी बँकेकडे पाठविले जातात आणि त्यानुसार प्राप्त होणारा पतपुरवठा कृषी पतपुरवठा संस्थांद्वारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविला जातो.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक - व्याख्या (Definition of DCCB)

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायद्यानुसार, 'जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे अशी बँक, जी विशिष्ट जिल्ह्यात स्थापन झालेली असते. जी बँक आपल्या जिल्ह्यातील सहकारी संस्थांना आपल्या भांडवलाच्या कुवतीनुसार कर्ज देते आणि सहकारी कायद्याच्या व बँकिंग कायद्याच्या चौकटीत राहून इतर बँकिंगचा व्यवहार करते.'

श्री. जे. पी. नियोगी यांनी दिलेल्या व्याख्येप्रमाणे 'जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे अशी सहकारी बँक जी जिल्ह्यातील इतर सहकारी संस्थांना कर्जे देण्यासाठी फंड गोळा करते. अशी बँक प्राथमिक नागरी सहकारी बँक नसते. '

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे प्रशासन

## (Administration Structure of DCCB)

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभासदांची सभा ही सर्वोच्च असते. संस्थेचे धोरण सभासदांच्या सभेत ठरविले जाते. सभासद आपले प्रतिनिधी संचालक मंडळावर निवडून देतात. राज्य सहकारी बँक आपला एक प्रतिनिधी संचालक मंडळावर पाठविते. संचालक मंडळाची मुदत पाच वर्षांची असते. संचालक मंडळ अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड करते. कार्याच्या सोईसाठी काही संचालकांचा समावेश असणाऱ्या उपसमित्या नेमल्या जातात. बँकेच्या अंतर्गत व्यवस्थापनासाठी कृषी विभाग, बिगर कृषी विभाग, हिशेब विभाग, प्रशासन विभाग, तपासणी विभाग आणि अन्य विभाग असतात. या विभागांतून आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग आणि विभागप्रमुख नेमलेला असतो.

## ११.४ भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगती (Progress)

### भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कामगिरी (रु. कोटीत)

| अ. नं. | तपशील | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शाखा संख्या | १३३२७ | १३४९५ | १३६५५ | १३८११ | १४०६० | १४२४१ | १४२५२ |
| २. | सभासद संख्या | ३९४५४८९ | ३४२०५२० | ३९१५६५७ | ३५६३४९७ | ३०४८७६५ | ३२०८७२० | ३२३३८६४ |
| ३. | वसूल भांडवल | ७२५५ | ८१८९ | ८९१५ | ९७७४ | १३४१० | १२८७७ | १४६१६ |
| ४. | राखीव निधी | २०६९२ | २२९२० | २४३७५ | २५६९० | २८८१२ | ३१८४४ | ३३४४५ |
| ५. | एकूण ठेवी | १६१३०९ | १७६७११ | १९५७२६ | २१५६६२ | २५१११६ | २८२६०९ | ३११८५८ |
| ६. | खेळते भांडवल | २३५४३१ | २५७३०६ | २८८०२१ | ३१८६५१ | ३७७०९८ | ४०६०९३ | ४५५२१३ |
| ७. | एकूण कर्जवाटप | १३७७५४ | १६२५५७ | २०९३७१ | २१७९४१ | २३२४२१ | २४१३७६ | २५३२८२ |
| ८. | वसूल कर्जे | ७७०६९ | ९७१६७ | १२३२१५ | १३५५७७ | १५०१७४ | १६०४२५ | १६६६१५ |
| ९. | थकीत कर्जे | २९०४९ | २७२०९ | ३१५३० | ३७७५२ | ३९७२५ | ४०३१५ | ५०७१३ |
| १०. | व्यवस्थापनावरील खर्च | ५३०७ | ५८६५ | ७३७५ | ८०५५ | ९७५८ | १०१३६ | १०३७७ |

(स्रोत : राज्य सहकारी बँकांचा राष्ट्रीय महासंघ (NAFSCOB)

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या समस्या (Problems)

## १. अपुरी साधनसामग्री:

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील साधनसामग्री अपुरी आहे. तसेच त्या मोठ्या प्रमाणात ठेवीही गोळा करू शकत नाहीत. त्यामुळे प्राथमिक संस्थांची गरज पूर्ण करू शकत नाहीत. थकबाकीच्या वाढत्या प्रमाणामुळे भांडवलाची सतत कमतरता भासते.

**२. कर्जवाटप व भागभांडवल वाढीच्या तत्त्वाची फारकत** कर्जवाटप व भाग खरेदी यात दुवा निर्माण व्हावा व त्याद्वारे कर्जवाटपाबरोबर भागभांडवलात वाढ व्हावी ही या बँकांकडून अपेक्षा होती. परंतु कर्जवाटपाच्या प्रमाणात भांडवलात बाढ झालेली नाही. अयोग्य कर्ज वाटप, अपुरे तारण, हितसंबंधी संस्थांना कर्जवाटप आणि थकबाकीचे वाढते प्रमाण हे या बँकांचे वैशिष्ट्य बनले आहे. जागतिकीकरणाच्या युगात ही बँक इ-बैंकिंग सेवा देण्यात मागे आहे.

**३. अपुऱ्या बँकिंग सेवा :** काही राज्यांत या बँकांना ठेवीदारांना पुरेशा बँकिंग सेवा देण्यात अपयश आले आहे. त्यामुळे ठेवीदार व बँकांस चांगले संबंध प्रस्थापित होण्यात अडचणी येतात व ठेवीत वाढ होत नाही. सामान्य लोकांना ही बँक आकृष्ट करू शकत नाही.

**४. संस्थांचे निरीक्षण करण्यातील त्रुटी:** प्राथमिक सहकारी संस्थांचे निरीक्षण या बँकांनी करावे ही अपेक्षा आहे. परंतु पंजाब, उत्तर प्रदेश, राजस्थान, जम्मू काश्मीर या राज्यांत अजूनही संस्थांच्या निरीक्षणाचे कार्य राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली कार्य करणाऱ्या सेवकवर्गातर्फे केले जाते. तसेच निरीक्षणाच्या कार्यासाठी सेवकवर्ग प्रशिक्षित नसल्याने अडचणी येतात.

**५. कर्जवाटप व कर्जवाटप पद्धतीतील त्रुटी:** मध्यवर्ती सहकारी बँकांचे कर्जवाटप व कर्जवाटपाची पद्धत यात पुढील त्रुटी आहेत. (अ) कर्जाच्या वापरावर लक्ष ठेवण्यासाठी पुरेशी यंत्रणा नाही. (ब) कर्ज हप्त्याने व वस्तुरूपात दिले जात नाही. (क) कर्जवाटप व हंगाम यात समन्वय नाही. (ड) कर्जवसुली व शेतीमाल खरेदी-विक्रीत अजूनही पुरेसा संबंध प्रस्थापित केलेला नाही.

**६. कर्जवाटपातील दिरंगाई :** कर्जवाटपात दिरंगाई होते. कर्जवाटप समितीच्या सभा वेळेवर होत नाहीत व कर्जाचे अर्जही वेळेवर कर्जवाटप समिती सभेपुढे निर्णयासाठी ठेवले जात नाहीत. राजकीय हस्तक्षेपामुळेही कर्जवाटपात दिरंगाई होते.

**७. कर्जवाटपातील दोष कर्जवाटप करताना अल्प मुदत कर्ज व मध्यम मुदत :** कर्ज असा फरक केला जात नाही. या बँका अजूनही वैयक्तिक कर्जे देतात, काही बँका कर्जावर व्याजही अधिक दराने आकारतात.

**९. अप्रशिक्षित सेवकवर्ग :** या बँकांकडील सेवकवर्ग पूर्णपणे प्रशिक्षित नाही. बँकांवरील राजकीय दबावामुळे सेवकवर्गाची निवड होत नाही. त्यामुळे संस्थेच्या व्यवहारात अनेक अडचणी येतात. त्यातून अकार्यक्षमता वाढीस लागते.

**१०. अनिष्पादित मालमत्तेतील वाढ :** सदर बँकांनी वाटप केलेली कर्जे वेळेवर वसूल होत नाहीत. परिणामतः बँकांच्या अनिष्पादित मालमत्तेत वाढ होते. अशा मालमत्तांसाठी वेगळी तरतूद करावी लागत असल्याने त्याचा परिणाम बँकेचा ताळेबंद खराब होण्यात होतो.

## २. कर्जवाटपात सुलभता:

कर्जवाटप करताना ते वेळेवर व हंगामात मंजूर करावे. कर्जे ही हप्त्याने द्यावीत व त्यांच्या वापरावर लक्ष ठेवावे, कर्जे शेती संस्थांना वेळेवर उपलब्ध व्हावीत. संचालकांच्या नातेवाईक आणि हितसंबंधितांना काळजीपूर्वक कर्जे द्यावीत.

## ३. कार्यपद्धतीत सुधारणा :

बँकांच्या कार्यपद्धतीत कार्यक्षमता व नियमितपणा आणणे अत्यंत आवश्यक आहे. त्यातून कृषी कार्यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर कर्जे मिळू शकतील.

**४. योग्य गुंतवणूक :** बँकांनी निधीची गुंतवणूक योग्य प्रकारे करण्याचे धोरण : अवलंबावे. दबावाखाली गुंतवणूक करण्याचे टाळावे. अयोग्य कर्जवाटप, अनावश्यक कार्यासाठी कर्जे देणे, कर्जे परत करण्याची क्षमता विचारात न घेणे या गोष्टी टाळणे आवश्यक आहे.

**५. थकबाकी वसुली :** संस्थांकडील व व्यक्तींकडील थकबाकी वसुलीचा वेग वाढवावा. कर्जफेडीच्या बाबतीत टाळाटाळ करणाऱ्या व्यक्ती व संस्थांविरुद्ध कारवाई करावी. राजकीय दबावास न जुमानता कायदेशीर मार्गाने थकीत कर्जे वसूल करावीत. या संदर्भात सहकार खात्याने थकबाकी वसुलीबाबत निर्देशन केले आहे. तसेच अनिष्पादित मालमत्ता ठेवणे तसेच बुडीत कर्जाबाबत नफ्यातून तरतुदी करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचे पालन करावे.

## ६. प्रशिक्षित सेवकवर्ग नेमणे

बँकेद्वारे सेवकवर्गाची भरती करताना कोणाचेही हितसंबंध न जुमानता आणि राजकीय दबावाकडे दुर्लक्ष करून शिक्षित आणि बँकिंग कार्याविषयी माहिती असणारा सेवकवर्ग नेमणे आवश्यक आहे. तसेच कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षण आवश्यक करण्यात यावे. जुन्या कर्मचारी वर्गास उजळणी प्रशिक्षणाची सोय करण्यात यावी. बँकेची कार्ये आणि पार पाडावयाची भूमिका लक्षात घेऊन बँकेने प्रशिक्षण कार्यक्रम तयार करावा आणि त्यात नवीन बँकिंग पद्धतीचा समावेश केलेला असावा.

## ७. कर्ज वापरावर नियंत्रण :

जिल्ह्यातील सहकारी संस्थांना कर्जाचे वाटप केल्यानंतर अशा कर्जाचा वापर हा ज्या कारणासाठी कर्ज दिले त्यासाठी आणि उत्पादन कारणासाठी वापरले जाईल याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी ठरावीक मुदतीने सहकारी संस्थांच्या कर्ज वापराची देखरेख केली पाहिजे. शेतीसाठी हंगामी कर्जे देताना ती वस्तुरूपात म्हणजेच बियाणे, खते, जंतुनाशके इत्यादी स्वरूपात दिली जावीत. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढून कर्जवसुली होण्यास मदत होईल.

## ८. राजकीय दबावापासून दूर:

या बँकांनी राजकीय दबावाचे वर्चस्व न मानता कर्जे ही योग्य आणि अर्थक्षम संस्थांनाच द्यावीत. त्यामुळे वसुलीची समस्या राहणार नाही. बँकांच्या नित्याच्या कार्यात राजकीय हस्तक्षेप करू दिला जाऊ नये, बँकांनी व्यवहारात बँकिंग तत्त्वे आणि रिझर्व्ह बँक तसेच सहकार खात्याने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

## ९. व्यवस्थापकीय खर्चात कपात :

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतून अतिरिक्त कर्मचारी वर्ग नेमला गेला आहे. त्याचे प्रमाण कमी व्हावे. तसेच व्यवस्थापकीय खर्चात कपात करणे आवश्यक आहे. त्यामुळे नफ्यात वाढ होण्यास मदत होईल.

## १०. सामाजिक दबावातून कर्जवसुली :

बँकेकडून राजकीय नेत्यांच्या दबावाखाली असणाऱ्या संस्थांना मोठ्या प्रमाणात कर्जवाटप झाले आहे. कर्जफेडीबद्दल या संस्थांचा दृष्टिकोण नकारात्मक आहे. अशा संस्थांवर सामाजिक दबाव आणून कर्जे वसूल केली पाहिजेत. वेळप्रसंगी कायदेशीर मार्गाने तारण मालमत्ता लिलाव करून कर्जवसुलीवर भर दिला पाहिजे.

# राज्य सहकारी बँका

## (State Co-operative Banks)

सहकारी पतपुरवठा रचनेत शिखर स्तरावर कार्य करणाऱ्या या बँकेस 'राज्य सहकारी बँक' असे म्हणतात. प्रत्येक राज्यात सहकारी बँक कार्य करीत असते. रिझर्व्ह बँक आणि नाबार्डमार्फत प्राप्त होणाऱ्या निधींचा वापर करून राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिक मदत करण्याचे कार्य राज्य सहकारी बँका करीत असतात. राज्य सहकारी बँकांकडून प्राप्त झालेल्या निधीचा वापर करून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जिल्ह्यातील सहकारी संस्थांना अर्थपुरवठा करीत असतात.

राज्यातील प्रक्रिया सहकारी संस्थांना बीज भांडवल उपलब्ध करून देण्याचे कार्य या बँका करतात. तसेच, प्रक्रिया सहकारी संस्थांनी अन्य सार्वजनिक संस्थांकडून कर्जे उभारल्यास त्यासाठी हमी देण्याचे कार्यही राज्य सहकारी बँका करीत असतात. राज्यातील सहकारी चळवळीचे प्रतिनिधित्व करणे आणि सहकारी चळवळीस दिशा देण्याचे कार्य ही बँक करीत असते. राज्य सहकारी बँकेस जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची बँक असेही म्हणतात.

जे. पी. नियोगी यांनी केलेल्या व्याख्येनुसार, राज्य सहकारी बँक म्हणजे राज्यातील सहकारी चळवळीला अर्थपुरवठा करणारी राज्यातील सर्वोच्च सहकारी बँक होय. भांडवलाचे एकत्रीकरण करून निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये आवश्यकतेप्रमाणे निधी खेळवून तेथील मागासलेपणा दूर करणे, विकासाला चालना देणे व संपूर्ण राज्यातील सहकारी क्षेत्राचा समतोल विकास घडवून आणणे या उद्देशाने ही बँक कार्य करते.'

# राज्य सहकारी बँक प्रशासकीय रचना

## (Administrative Structure of SCB's)

राज्य सहकारी बँका अथवा केंद्रीय सहकारी बँका यांना राज्यपरत्वे लागू असणारे कायदे, बैंकिंग नियमनविषयक कायदे तसेच सदर बँकांचे पोटनियम यांच्या अधीन राहून बँकेचे व्यवस्थापन आणि प्रशासन पार पाडावे लागते.

राज्य सहकारी बँकांचा कारभार हा निवडलेल्या संचालक मंडळाद्वारे पार पाडला जातो. सदर मंडळावर नेमण्यात आलेल्या सदस्यांची संख्या किमान २१ इतकी असते. सदर सदस्यातील किमान दोन सदस्य हे लागू पोट नियमानुसार तज्ज्ञ संचालक असावे लागतात. संचालक मंडळाला बँकेच्या कारभाराचे नियंत्रण आणि नियमन करण्यासाठी आवश्यकतेनुसार दोन महिन्यांतून किमान एकदा एकत्र येणे आवश्यक असते.

बँकेचे दैनंदिन कामकाज व्यवस्थापकीय संचालकांच्या देखरेखीखाली चालते. या कार्यात त्यांना दोन ज्येष्ठ संचालकांची मदत मिळते. याखेरीज बँकेच्या प्रशासन मंडळात दोन सदस्य हे राज्य सरकारकडून नेमण्यात आलेले असतात. संचालक मंडळाकडून बँक प्रशासन कार्यासाठी तीन उपसमिती स्थापन केल्या जातात. ज्यामध्ये कर्ज समिती, कार्यकारी समिती आणि कर्मचारी समिती यांचा समावेश होतो.

सदर समिती प्रामुख्याने पुढील कार्यासाठी जबाबदार ठरतात.

**१. कर्ज समिती :** कर्ज समिती कर्ज प्रस्ताव, देशांतर्गत व परकीय पतहमी पत्रासाठीचे प्रस्ताव, सहकारी आणि इतर घटकांच्या वतीने आलेले बँक हमी मागणी प्रस्ताव या विषयावर विचार करते.

**२. कार्यकारी समिती:** कार्यकारी समिती सभासद प्रवेश, बँक समभागांचे वाटप, हस्तांतरण व विमोचन तसेच इतर प्रशासकीय व कार्यकारी विषयांबाबतचे काम बघते.

**३. कर्मचारी समिती:** कर्मचाऱ्यांशी संबंधित अशा गोष्टींचा जसे भरती, नेमणुका, बढती, प्रशिक्षण गरजा इत्यादींबाबत कर्मचारी समिती निर्णय घेते. बँक सभासदांची सर्वसाधारण सभा वर्षातून एकदा होते, तर कर्ज समिती आणि कार्यकारी समिती यांनी प्रति पंधरा दिवसातून एकदा वैकल्पिकरित्या आणि कर्मचारी समितीने तीन महिन्यांतून किमान एकदा बैठक घेणे आवश्यक असते.

# भारतातील राज्य सहकारी बँकांची प्रगती (Progress)

राज्य सहकारी बँकांची प्रगती (रु. लाखांत)

| तपशील | २०००–०१ | २००२–०३ | २००४–०५ | २००६–०७ | २००९–१० | २०१६–१७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. बँकांची संख्या | ३० | ३० | ३० | ३१ | ३१ | ३३ |
| २. शाखांची संख्या | ८६५ | ९३१ | ९५३ | ९३८ | १०१५ | ११९७ |
| ३. सभासद संख्या – संस्था | १८६७४ | ११९३३ | १७५४५ | २१३९० | ११७३२ | २०३७५ |
| व्यक्ती | १०३७९० | ११४५५५ | १३९०७८ | १२७३८१ | ३११०७६ | ८२२८३७ |
| ४. वसूल भांडवल (रु.) | ६९७११ | ८९७१५ | ९९२२८ | १४३६६८ | १६२९५८ | ४८५२७६ |
| ५. राखीव निधी (रु.) | ३७११७२ | ५००१६८ | ६५८९८१ | ८१४४९० | ८७६२८१ | १२४५९८७ |
| ६. एकूण ठेवी (रु.) | ३२६१२९५ | ३९१११७८ | ४४०६७६५ | ४९११९७५८ | ६१४४२१ | १२१६८८५२ |
| ७. एकूण कर्जे (रु.) | ११९८३३५ | ११९८५०८ | १४६७०९७ | २२१५०२४ | २३६३२५२ | १२२५४५०१ |
| ८. कार्यकारी भांडवल (रु.) | ५५१६८९ | ६०७५४७५ | ७०६८२१३ | ८३४४६९० | १२२०५७३३ | २२०८५८१७ |
| ९. गुंतवणूक (रु.) | १३०४०१६ | १६४८५०१ | २१३२८०६ | २३९७०२९ | ५०३२०९८ | ६६४८१५१ |
| १०. दिलेली कर्जे–अल्प (रु.) | २९७०४९७ | ३२८३७३४ | ३१६४५२९ | ३६५४६११ | ४६४६००० | ७१०९९६४ |
| ११. दिलेली कर्जे–मध्यम (रु.) | ५७१७०१ | ८०७४२९ | १२६७९७७ | १०५२२७९ | १३३२३९५ | – |
| १२. कर्जे येणे–अल्प (रु.) | १८६३७५५ | २२०४८७७ | ३१३३६२८ | ३००२८१४ | ३४५६११० | ६७७८८२८ |
| १३. कर्जे येणे–मध्यम (रु.) | २७५०२० | ११२०१४२ | १३९७०२४ | १६६४७६७ | १४५४१६३ | – |
| १४. सेवकवर्ग (संख्या) | १६१४६ | १५७९३ | १५२८८ | १४७४८ | १३७८१ | १२८२४ |

(संदर्भ : राज्य सहकारी बँक राष्ट्रीय महासंघ. NAFSCOBY)

## राज्य सहकारी बँकांचे विविध उद्देशांनुसार कर्जवाटप

| उद्देश | १९६२–६३ कोटी रु. | १९६६–६७ कोटी रु. | १९६७–६८ कोटी रु. | १९७७–७८ कोटी रु. |
|---|---|---|---|---|
| (अ) अल्प मुदत | २८०.८७ | ४०२.५६ | ५५२.२७ | १७२८.५० |
| १. हंगामी कृषी कार्यासाठी | १८३.८८ | २८१.७५ | ३३२.५४ | ५३३.२८ |
| २. पिकांची विक्री करण्याकरिता | ००९.३५ | १२.९२ | ०३१.६१ | २६.४० |
| ३. औद्योगिक कार्यासाठी | २६.०३ | १५.३५ | ०१३.२० | १०८.८२ |
| ४. इतर उद्देशांसाठी | ६१.६१ | ९२.५४ | १४४.९२ | १०६०.०० |
| (ब) मध्यम मुदत | १३.९६ | ३०.३७ | २१.६५ | ३८.५८ |
| ५. विहिरी खोदणे व दुरुस्तीसाठी | १.११ | ५.८६ | ५.८२ | ३.८३ |
| ६. यंत्रांच्या खरेदीसाठी | ४.९० | २.३७ | १.४३ | ६.८३ |
| ७. जनावरांच्या खरेदीसाठी | २.९५ | ५.६९ | १.५६ | १.८० |
| ८. जमिनीच्या किरकोळ दुरुस्तीसाठी | ०.८३ | ०.४७ | ३.३९ | ०.२७ |
| ९. इतर उद्दिष्टांसाठी | ४.१७ | १५.९८ | ९.४५ | २५.८५ |

# राज्य सहकारी बँकांच्या समस्या (Problems)

## १. अपुरे भांडवल :

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून येणाऱ्या कर्जाच्या मागण्या पुऱ्या करण्यासाठी राज्य सहकारी बँकेस भांडवलाची नेहमीच उणीव जाणवते. राज्य सहकारी बँकेचे स्वतःचे भागभांडवल कमी आहे तसेच ठेवी मोठ्या प्रमाणात आकर्षित करण्यात बँक यशस्वी झालेली नाही. बँकेकडील बऱ्याचशा ठेवी या सहकारी संस्थांनी ठेवलेल्या आहेत.

## २. अयोग्य गुंतवणूक :

काही सहकारी बँकांनी आपल्या निधींची गुंतवणूक करताना विशेष काळजी घेतली नाही असे आढळून येते. रिझर्व्ह बँकेच्या कृषी कर्जपुरवठा खात्याने राज्य सहकारी बँकांनी सहकारी संस्थांचे भाग विकत घेऊ नयेत अशी समज देऊनदेखील त्यांनी सहकारी संस्थांच्या भागभांडवलात रक्कम गुंतविली. राजकीय दबावामुळे अशी गुंतवणूक केली असावी अशी एक समजूत आहे.

## ३. वैयक्तिक कर्जपुरवठा :

या बँकांनी अजूनही वैयक्तिक पतपुरवठा करण्याचे धोरण पूर्णपणे थांबविलेले नाही. रिझर्व्ह बँकेने या बाबतीत वारंवार समज दिल्याचे कळते. आसाम, उत्तर प्रदेश या राज्यांत हा दोष प्रकर्षाने आढळतो.

**४. थकबाकीचे वाढते प्रमाण:** वाढत्या थकबाकीच्या दोषांमधून राज्य सहकारी बँकाही सुटल्या नाहीत. थकबाकीचे प्रमाण जरी कमी असले तरीसुद्धा वरिष्ठ पातळीवरील बँकेमध्ये अशी थकबाकी दृष्टोत्पत्तीस येणे योग्य नाही म्हणून कर्जवसुली करण्यासाठी गंभीरपणे व सतत प्रयत्न केला जावा.

**५. निरीक्षण व तपासणी कार्यातील कमतरता :** मध्यवर्ती राज्य सहकारी बँकांच्या कार्यावर आणि व्यवस्थापनावर देखरेख करण्याचे व त्यांची योग्य तपासणी करण्याचे कार्य या बँकेकडे असते. परंतु मागील अनुभव जमेस धरता हे कार्य गंभीरपणे केले गेले नाही असे दिसते. त्यामुळे कर्जाचा दुरुपयोग आणि थकबाकी यांचे प्रमाण वाढते. शिखर बँकेकडे अशी तपासणी करण्यासाठी पुरेसा निरीक्षक अधिकारी वर्ग नसतो. त्यामुळे हे कार्य केवळ नाममात्र होते.

## ६. मध्यम मुदतीच्या कर्जवाटपांबाबत उदासीनता :

शिखर बँका मध्यम मुदतीची कर्जे सहकारी बँकांना पुरवू शकल्या नाहीत, परंतु अशी कर्जे त्यांनी द्यावीत म्हणून रिझर्व्ह बँक त्यांना सोय उपलब्ध करून देते. बहुतेक राज्यांमध्ये रिझर्व्ह बँक मध्यम मुदत कर्ज देण्यास तयार असूनसुद्धा या बँकांनी या बाबतीत उत्साह दाखविला नाही.

## ७. कर्जविषयक सदोष पद्धती :

मध्यवर्ती सहकारी बँकांना कर्जवाटप करताना काळजी घेणे आवश्यक असते. अशी काळजी काही बँका घेत नाहीत असे दिसून आले आहे. या बँकांनी अर्थपुरवठा करण्याचे कार्य हाती घ्यावे व तिने मध्यवर्ती बँकेस स्वावलंबी व क्रियाशील बनविण्यास सहकार्य द्यावे.

# उपाययोजना (Remedies to Problems)

## १. संचालक मंडळाची पुनर्रचना आवश्यक :

राज्य सरकारने या बँका भक्कम पायावर उभ्या करण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न केले आहेत. उदा. भांडवलात सहभाग, व्यवस्थापकीय अनुदान इत्यादी. याबरोबरच या बँकांच्या संचालक मंडळामध्ये राज्य सरकारने रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने योग्य बदल घडवून आणावा आणि त्या मंडळात सहकारी प्रतिनिधी आणि कृषी व बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश करावा.

**२. रिझर्व्ह बँकेचे निरीक्षण:** सहकारी बँकांच्या कायद्यामध्ये योग्य बदल करून रिझर्व्ह बँकेला आपला प्रतिनिधी निरीक्षक म्हणून या बँकेवर नेमता येईल अशी व्यवस्था करण्यात यावी. त्यामुळे असा प्रतिनिधी बँकेच्या संचालक मंडळाच्या सभेत धोरणात्मक बाबींसंबंधी सूचना व मार्गदर्शन करू शकेल.

**३. सरकारची भागीदारी:** राज्य सहकारी बँकांना आर्थिक बळकटी प्राप्त करून देण्यासाठी राज्य सरकारने राज्य सहकारी बँकांच्या भागभांडवलात सहभागी व्हावे. त्यामुळे या बँकांना कर्जाच्या मागण्या पुऱ्या करणे शक्य होईल.

## ४. प्रशिक्षण व्यवस्था

राज्य सहकारी बँकेने आपल्या कामकाजात कार्यक्षमता आणि तत्परता आणण्याच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षणाची व्यवस्था करावी. तसेच आधुनिक बँकिंगप्रणाली शिकविण्याच्या दृष्टीने आवश्यक असा प्रशिक्षण कार्यक्रम आखावा. तसेच जुन्या कर्मचारी वर्गासाठी उजळणी प्रशिक्षण कार्यक्रमाची राबवणूक करावी.

## ५. सभासद संस्थांवर कारवाई :

राज्य सहकारी बँकेस आवश्यक असणारी माहिती आणि नियमितपणे पाठवावी लागणारी माहिती आणि पत्रके ज्या सभासद बँका पाठवत नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्याचे धोरण बँकेने अवलंबावे. बऱ्याच वेळा सभासद संस्थांकडून पुरेशी माहिती व कागदपत्रे न आल्यामुळे कार्यक्रमाची आखणी करणे, आर्थिक योजना आखणे अथवा सरकारकडे पुरेशी माहिती पाठविणे शक्य होत नाही. त्यामुळे राज्य सहकारी बँकेच्या कार्यावर टीका होते. अशा वेळी ज्या सभासद संस्था चुकार आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याचे धोरण बँकेने अवलंबणे अत्यंत आवश्यक आहे.

## ६. थकबाकी प्रमाण कमी करणे :

राज्य सहकारी बँकांनी कर्जवसुलीबाबत पुरेशी काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. राजकीय दबावाखाली कर्ज मंजूर करणे टाळावे. कर्जाचे धोरण काळजीपूर्वक आखून कर्ज मंजुरीबाबत योग्य पद्धती अनुसरावी. या संदर्भात बँकेने वेळप्रसंगी कायदेशीर कारवाई करणे यासारखे उपाय अवलंबावेत.